रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जानेवारी ५, २००४/पौष १५, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.–महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.** . . | १–४ |


दिनांक २९ डिसेंबर २००३ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग.

## सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ५ जानेवारी २००४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९७१ चा महा. २८. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून त्यांनी दिनांक २३ ऑक्टोबर २००३ रोजी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) अध्यादेश, २००३ हा प्रख्यापित केला होता ; (२००३ चा महा. अध्या. १०.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम, २००३ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २३ ऑक्टोबर २००३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ यामध्ये प्रकरण एक-क समाविष्ट करणे.

**२.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ ( यात यापुढे ज्याचा " मुख्य अधिनियम " असा निर्देश करण्यात आला आहे), याच्या कलम ३ झेड-२ नंतर पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— १९७१ चा महा. २८.

**" प्रकरण एक-क**

**झोपडपट्टी क्षेत्रांतील संरक्षित भोगवटादारांसाठी असलेल्या, पूर्वस्थितीत पुनर्वसन करणाऱ्या गृहनिर्माण योजनांसाठी विशेष तरतुदी.**

व्याख्या.

**३ झेड-३.**—या प्रकरणामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " गृहनिर्माण समिती " याचा अर्थ, कलम ३ झेड-४ अन्वये स्थापन केलेली गृहनिर्माण समिती, असा आहे ;

(ब) " गृहनिर्माण योजना " याचा अर्थ, कलम ३ एक्स च्या खंड (क) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जे संरक्षित भोगवटादार आहेत अशा झोपडपट्टीवासीयांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी योजनेच्या क्षेत्रामध्ये निवासी घरांचे (युनिट्स) अथवा संरचनांचे बांधकाम किंवा पुंनर्बांधकाम करण्याकरिता आणि अशा योजनेच्या क्षेत्रात त्यांचे पूर्वस्थितीत पुनर्वसन करण्याकरिता राज्य शासनाने किंवा भारत सरकारने तयार केलेली व घोषित केलेली योजना, असा आहे ;

(क) " योजना क्षेत्र " याचा अर्थ, या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी, संबंधित गृहनिर्माण समितीकडून योजना क्षेत्र म्हणून **राजपत्रात** घोषित करण्यात आलेले कोणतेही क्षेत्र असा आहे आणि त्यात कलम ४ अन्वये झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या कोणत्याही क्षेत्राचा अंतर्भाव होतो ;

(ड) यात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यामध्ये जे जे अर्थ नेमून देण्यात आले असतील, ते ते अर्थ असतील. १९६६ चा महा. ३७.

गृहनिर्माण समिती घटित करणे.

**३ झेड-४.**—राज्य शासन, या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी, आदेशाद्वारे प्रत्येक जिल्ह्यासाठी गृहनिर्माण समिती अथवा समित्या स्थापन करील आणि अशा समितीची किंवा, यथास्थिती, समित्यांची रचना व कामे आणि अधिकार व कर्तव्ये ही विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

विकासाची परवानगी.

**३ झेड-५.**—(१) कोणत्याही गृहनिर्माण योजनेखाली, योजना क्षेत्रातील संरक्षित भोगवटादाराला, विहित केलेल्या रीतीने नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यानंतर, गृहनिर्माण योजनेच्या अटी व शर्तीनुसार, निवासी संरचनेचे बांधकाम किंवा पुनर्बांधकाम करता येईल.

(२) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, नियोजन प्राधिकरणाला एखाद्या गृहनिर्माण योजनेखालील कोणत्याही विकासाच्या किंवा पुनर्विकासाच्या बाबतीत, आवश्यक वाटतील तेथे तेथे विकास नियंत्रण नियम व विनियम यांसह विकास योजनेच्या किंवा प्रादेशिक योजनेच्या तरतुदी शिथिल करता येतील :

परंतु, हे शिथिलीकरण प्रथम संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांची, किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची लेखी सहमती मिळविल्याशिवाय केले जाणार नाही.

(३) गृहनिर्माण समितीला, याबाबत काढलेल्या विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे राज्य शासनाकडून वेळोवेळी सोपविण्यात येतील अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगती नसणारी इतर आनुषंगिक किंवा संबंधित कार्ये व कर्तव्येदेखील पार पाडता येतील.

१९६६ चा महा. ३७. (४) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमानुसार राज्य शासनास वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल अशा गृहनिर्माण योजनेच्या बाबतीत हाती घेण्यात येणाऱ्या कोणत्याही विकासासाठी, नियोजन प्राधिकरणाला, उक्त अधिनियमान्वये कोणतेही विकास आकार किंवा कोणतीही फी देय असणार नाही.

**३ झेड-६.**––या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या प्रकरणातील कोणतीही गोष्ट,–– या प्रकरणाच्या तरतुदी विवक्षित क्षेत्रांत लागू न होणे.

(अ) भारताच्या राष्ट्रपतींनी भारताच्या संविधानाच्या अनुसूचीत पाचच्या परिच्छेद ६ अन्वये आदेश काढून अनुसूचित क्षेत्रे म्हणून घोषित केलेली क्षेत्रे ;

१९८० चा ६९. (ब) वन (संरक्षण) अधिनियम, १९८० ज्याला लागू होतो, असे वन क्षेत्र ;

१९८६ चा २९. (क) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम ३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (पाच) अन्वये घोषित करण्यात आलेले सागरी विनियमन क्षेत्र ;

१९८६ चा २९. (ड) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम ३ चे पोट-कलम (१) व पोट-कलम (२) चा खंड (पाच) या अन्वये घोषित करण्यात आल्याप्रमाणे पारिस्थितिक संवेदनाक्षम क्षेत्र आणि पारस्थितिकीयदृष्ट्या भंगुर क्षेत्रे ;

(ई) राज्य शासनाने अधिसूचित केली असतील अशी थंड हवेची ठिकाणे ;

(फ) केंद्र किंवा राज्य शासनाने घोषित केली असतील अशी विशेष पर्यटन क्षेत्रे ;

(ग) गृहनिर्माण योजनेसाठी स्वेच्छेने देऊ केल्या नसतील अशा, केंद्र सरकारच्या किंवा त्याच्या कोणत्याही संस्थेच्या मालकीच्या जमिनी ;

(ह) राज्य शासनाच्या किंवा संबंधित गृहनिर्माण समितीच्या मतानुसार जे मानवी वसतिस्थानासाठी अयोग्य आहे किंवा ज्यास या प्रकरणाच्या तरतुदी लागू करणे हे लोकहिताचे होणार नाही, असे कोणतेही झोपडपट्टी क्षेत्र ;

यांना लागू होणार नाही.

**३ झेड-७.** कलम ३ झेड-५ च्या पोट-कलम (२) अन्वये अधिकारांचा वापर करणारा प्राधिकारी, राज्य शासन वेळोवेळी फर्माविल असे अहवाल, विवरणे आणि इतर माहिती, राज्य शासनाला सादर करील.''. राज्य शासनाचे नियंत्रण.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ४६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४६ मधील पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :--

"परंतु, या अधिनियमाच्या प्रकरण एक-क च्या प्रयोजनांसाठी जेव्हा प्रथमच नियम केले जात असतील तेव्हा ते, पूर्वप्रसिद्धीशिवाय करता येतील.".

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याचे निरसन व व्याप्ती.

**४.** (१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) अध्यादेश, २००३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००३ चा महा. अध्या. १०.

(२) अशाप्रकारे निरसन झाले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यासह) ती, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये, करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही किंवा यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, जानेवारी ५, २००४/पौष १५, शके १९२५**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) (Amendment) Act, 2003 (Mah. Act No. I of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. I OF 2004.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 5th January 2004.)*

An Act further to amend the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Govenor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) (Amendment) Ordinance, 2003, on the 23rd October 2003 ;

Mah. XXVIII of 1971.

Mah. Ord. X of 2003.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Fifty-fourth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) (Amendment) Act, 2003.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 23rd October 2003.

Insertion of Chapter I-C in Mah. XXVIII of 1971.

2. After section 3Z-2 of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 (hereinafter referred to as "the principal Act"), the following Chapter shall be inserted, namely :— Mah. XXVIII of 1971.

" CHAPTER I-C

SPECIAL PROVISIONS FOR IN SITU REHABILITATION HOUSING SCHEMES FOR PROTECTED OCCUPIERS IN SLUM AREAS.

Definitions.

**3Z-3.** In this Chapter, unless the context otherwise requires,—

(*a*) "Housing Committee" means a Housing Committee constituted under section 3Z-4 ;

(*b*) "housing scheme" means a scheme formulated and declared by the State Government or the Government of India, for the construction or reconstruction of dwelling units or structures in the scheme area for providing basic amenities to the slum dwellers who are protected occupiers as defined in clause (*c*) of section 3X and their in *situ* rehabilitation in such scheme area ;

(*c*) "scheme area" means any area declared as the scheme area by the concerned Housing Committee, in the *Official Gazette,* for the purposes of this Chapter and shall include any area declared as the slum area under section 4 ;

(*d*) words and expressions used herein but not defined, shall have their respective meanings as assigned to them in the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Mah. XXXVII of 1966.

Constitution of Housing Committee.

**3Z-4.** The State Government shall, for the purposes of this Chapter, by order, constitute the Housing Committee or Committees for each district, and the composition, and functions and powers and duties of such Housing Committee or Committees, as the case may be, shall be such as may be prescribed.

**3Z-5.** (*1*) Under any housing scheme, the protected occupier in the scheme area may, after obtaining the permission of the Planning Authority, in the prescribed manner, construct or re-construct a dwelling structure as per the terms and conditions of the housing scheme. Development permission.

(*2*) Notwithstanding anything contained in this Act or any other law for the time being in force, the Planning Authority may relax, the provisions of the Development Plan or Regional Plan, including the Development Control Rules or Regulations, wherever found necessary in regard to any development or redevelopment under a housing scheme :

Provided that, no such relaxation shall be made without first obtaining in writing, the concurrence of the Director, Town Planning, Maharashtra State or an officer authorised by him in this behalf.

(*3*) The Housing Committee may also carry out such other incidental or connected functions and duties as may be assigned to it by the State Government, from time to time, by special or general orders issued in this behalf, not inconsistent with the provisions of this Act.

Mah. XXXVII of 1966. (*4*) Notwithstanding anything contained in the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, no development charges or any other fee shall be payable to the Planning Authority under the said Act, for any development undertaken in respect of a housing scheme, as may be notified from time to time, by the State Government under this Act.

**3Z-6.** Notwithstanding anything contained in this Act, nothing in this Chapter shall apply to the,— Provisions of this Chapter not to apply in certain areas.

(*a*) Scheduled areas, declared as such by the President of India by an order under paragraph 6 of the Fifth Schedule to the Constitution of India ;

69 of 1980. (*b*) forest area to which the Forest (Conservation) Act, 1980 applies ;

(*c*) Coastal Regulation Zone as declared under clause (*v*) of sub-section (2) of section 3 of the Environment (Protection) Act, 1986 ; 29 of 1986.

(*d*) Eco-Sensitive Zones or Ecologically Fragile Areas as declared under sub-section (*1*) and clause (*v*) of sub-section (*2*) of section 3 of the Environment (Protection) Act, 1986 ; 29 of 1986.

(*e*) Hill Stations as notified by the State Government ;

(*f*) Special Tourism Areas, declared as such by the Central or State Government ;

(*g*) Lands belonging to the Central Government or any entity thereof unless the same is voluntarily offered for the housing scheme ;

(*h*) any slum area which, in the opinion of the State Government or the concerned Housing Committee, is unsuitable for human habitation or to which it would not be in the public interest to apply the provisions of this Chapter.

Control by State Government.

**3Z-7**. The authority exercising the powers under sub-section (*2*) of section 3Z-5 shall furnish to the State Government such reports, returns and other information as the State Government may, from time to time, require.".

Amendment of section 46 of Mah. XXVIII of 1971.

**3.** In section 46 of the principal Act, to sub-section (*1*), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, when the rules are being made for the purposes of Chapter I-C of this Act for the first time, the same may be made without prepublishing the same.".

Repeal of Mah. Ord. X of 2003 and saving.

**4.** (*1*) The Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) (Amendment) Ordinance, 2003 is hereby repealed. Mah. Ord. X of 2003.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the principal Act, as amended by this Act.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई